क्रमांक: महानिर्मिती/मांस-सेप्र/ No 01129 दिनांक: 30 JAN 2019

महानिर्मिती

महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

**"रसायनशास्त्रज्ञ" (Chemist)" या पदाच्या ऑनलाईन व वैयक्तिक मुलाखत परीक्षेअंती अंतिम निवड झालेल्या उमेदवारांची यादी.**

**संदर्भ:-** १) महानिर्मिती कंपनीच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली अधिसुचना दि.२८.११.२०१८
२) महानिर्मिती कंपनीच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली अधिसुचना दि.३०.११.२०१८
३) महानिर्मिती कंपनीच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली अधिसुचना क्र.१४५७२ दि.२०.१२.२०१८
४) महानिर्मिती कंपनीच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली अधिसुचना क्र.१४५७३ दि.२०.१२.२०१८
५) महानिर्मिती कंपनीच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली अधिसुचना क्र.१००५ दि.२५.०१.२०१९
६) मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ नागपूर येथे दाखल रिट याचिका क्र.८६८९/२०१८

---

उपरोक्त विषयास अनुसरुन महानिर्मिती जाहिरात क्र. ०१(जाने)/२०१७ अन्वये "रसायनशास्त्रज्ञ" (Chemist) यांची पदे सरळसेवेने भरणेबाबत जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. सदरील जाहिरातीच्या अनुषंगाने ऑनलाईन परीक्षा व वैयक्तिक मुलाखतीत प्राप्त गुणांनुसार तात्पुरती निवड / प्रतिक्षा यादी दि.१९.०७.२०१७ रोजी प्रसिद्ध करण्यात आली होती.

तदनंतर मा. मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपूर, यांनी याचिका क्र.४००३/२०१७ प्रकरणी दिलेल्या आदेशानुसार ऑनलाईन परीक्षेतील सुधारित गुणांची यादी संदर्भिय अधिसुचना क्र.०१ अन्वये प्रसिध्द करण्यात करण्यात आली होती. सदरील सुधारित गुणांच्या यादीनुसार वैयक्तिक मुलाखतीस पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी संदर्भिय अधिसुचना क्र.०२ अन्वये प्रसिध्द करण्यात करण्यात आली होती. सदरील यादीनुसार उमेदवारांची वैयक्तिक मुलाखत परीक्षा व कागदपत्रे पडताळणी प्रक्रिया पार पाडण्यात आली होती. तसेच त्यानुसार पात्र व अपात्र उमेदवारांची यादी संदर्भिय अधिसुचना क्र.०५ अन्वये प्रसिध्द करण्यात करण्यात आली होती.

महानिर्मिती कंपनीच्या संदर्भिय जाहिरातीच्या अनुषंगाने घेण्यात आलेल्या ऑनलाईन परीक्षेत उमेदवारांना १७८ गुणांपैकी (०१ प्रश्न बाद ठरविल्यामुळे) प्राप्त झालेल्या गुणांचे ८९ गुणांमध्ये व वैयक्तिक मुलाखतीत प्राप्त गुणांचे १० गुणात रुपांतर करुन अशी एकूण ९९ गुणांच्या आधारे तसेच समांतर आणि सामाजिक आरक्षण विचारात घेऊन व खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून अंतिम निवड झालेल्या उमेदवारांची यादी तयार करण्यात आलेली आहे.

१) महानिर्मिती प्रशासकीय परिपत्रक क्र.४०० दि.२३.०१.२०१८ अन्वये नमूद तरतूदीनुसार "रसायनशास्त्रज्ञ" (Chemist) या पदाची निवड यादी तयार करताना एकूण प्राप्त गुणांसाठी खुल्या प्रवर्गातील (Open Category) उमेदवारांच्या निवडीकरीता ४० गुणांचा व मागास प्रवर्गातील (Backward Class) उमेदवारांच्या निवडीकरीता ३० गुणांचा, निकष लावून त्याआधारे सदरील यादी तयार करण्यात आलेली आहे, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

२) "रसायनशास्त्रज्ञ" (Chemist) या पदाची निवड यादी घोषित करताना सर्व प्रकारची काळजी घेण्यात आलेली आहे. तथापि, अनावधानाने किंवा मुद्रण दोषामुळे झालेल्या चुका सुधारीत करण्याचा अधिकार महानिर्मिती कंपनीने राखून ठेवलेला आहे.

३) "रसायनशास्त्रज्ञ" (Chemist) या पदाची निवड यादी ही घोषित केल्याच्या तारखेपासून ०१ वर्षाकरीता वैध असेल.

४) जाहिरात क्र. ०१ (Jun)/२०१७ च्या भरती प्रक्रियेचा अभिलेख निकाल घोषित केल्याच्या दिनांकापासून तीन (३) महिन्याच्या कालावधीसाठी जतन करण्यात येईल. त्यापुढील काळात कोणत्याही तक्रारीची दखल घेतली जाणार नाही,याची उमेदवारांनी विशेष नोंद घ्यावी.

५) अयशस्वी उमेदवारांनीं कोणत्याही प्रकारचे पत्रव्यवहार महानिर्मिती कंपनीकडे करु नये. उमेदवारांच्या कोणत्याही पत्र व्यवहाराची महानिर्मिती कंपनीकडून दखल घेतली जाणार नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

ऑनलाईन व वैयक्तिक मुलाखत परीक्षेअंती अंतिम निवड झालेल्या उमेदवारांची यादी प्राप्त करुन घेण्यासाठी उमेदवारांनी खालील ठिकाणी क्लिक ↵ करावे.

**"रसायनशास्त्रज्ञ" (Chemist) या पदाची अंतिम निवड यादी.** ↵

(विनोद बोंदरे)
कार्यकारी संचालक (मासं)
महानिर्मिती